IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महार वतन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. शरद तानाजी ठोकळे**
इतिहास विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
*भारतीय ग्रामीण समाजव्यवस्था, महार वतन*

**ABSTRACT**

भारतीय ग्रामीण समाजव्यवस्था ही परंपरागत वतनदारी पद्धतीवर आधारित होती. विविध जातींना विशिष्ट सेवा देण्याच्या बदल्यात वतन दिले जात असे. महार वतनाला महाराष्ट्रामध्ये खूप मोठा इतिहास आहे. मराठा कालखंडात अतुलनीय पराक्रम केल्याबद्दल शौर्यशाली महारांना काही वतनी इनामी जमिनी देण्यात आल्या. सरकारच्या महत्त्वाच्या कामामध्ये त्यांचा उपयोग होत होता. मध्ययुगीन काळातील शेतशिवाराची माहिती ही फक्त महार वतनदारांनाच होती. त्यांनी शपथेवर दिलेली साक्ष गृहीत धरून न्याय निवाडा केला जात असे. न्यायदानाच्या कामामध्ये पाटील, कुलकर्णी यांना महार मदत करत. त्याकाळी महार लोकांचीच खरी साक्ष मानली जात होती. महार हे प्रामाणिक लोक समजले जात. मध्ययुगीन काळामध्ये प्रत्येक वतनदारांचे कार्यक्षेत्र, हक्क, मानपान आणि कर्तव्य निश्चित करण्यात आली होती परंतु वतनदारांच्यामध्ये महार वतन असणाऱ्या लोकांच्या कामासंबंधीचे कोणतेच निश्चित स्वरूपाचे नियम नव्हते. त्यांना सरकारी, बिन सरकारी आणि खाजगी स्वरुपाची कामे बारा महिने करावी लागत होती त्यामुळे त्यांचे खूप हाल होत होते. महार वतन ही महाराष्ट्रातील एक महत्त्वाची पण अन्यायकारक व्यवस्था होती. या व्यवस्थेमुळे ग्रामीण प्रशासन सुरळीत चालत असले, तरी महार समाजावर सामाजिक, आर्थिक व मानसिक गुलामी लादली गेली. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये महार वतन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचा अभ्यास करण्यात आला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Thokale, S. T. (2025). महार वतन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर: एक ऐतिहासिक अभ्यास. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 1(VI), 2146–2151.

**प्रस्तावना –**

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. महार वतन व्यवस्थेचा ऐतिहासिक उगम व स्वरूप अभ्यासणे.

२. महार वतनातील कामे, हक्क व जबाबदाऱ्या समजून घेणे.

३. महार वतन व्यवस्थेचे सामाजिक व मानसिक परिणाम विश्लेषित करणे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महार वतनविरोधी विचारांचा अभ्यास करणे.

**महार वतनाचा इतिहास**

महार वतन व्यवस्थेचा उगम मध्ययुगीन काळात झाला. महार वतनाची परंपरा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासत शतकानुशतके रुजलेली आहे. बिदरच्या बादशाहने आणि निजामशाहीकडून महारांना गाव सेवाच्या बदल्यात मोबदला म्हणून जमिनी बहाल करण्यात आल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या भूमिकेला राजकीय मान्यता प्राप्त झाल्याचे दिसते. १५३० साली त्यांना शेतसारा ही माफ करण्यात आला होता. यावरून महार समाजाला दिलेली प्रतिष्ठा सपष्ट दिसते. गावातील सीमा तपासणे, भोगवटा तपासणे, स्थानिक तंट्यामध्ये साक्ष देणे, गावाच्या सुरक्षेसाठी, संदेशवहनासाठी व प्रशासकीय कामांसाठी अशा अनेक जबाबदाऱ्या महार समाजावर सोपविण्यात आल्या. सेवांच्या बदल्यात त्यांना वतन स्वरूपात जमिनी दिल्या जात असे. ब्रिटिश काळात Bombay Hereditary Offfice Act, 1874 मुळे महार वतनदारांना पाटील, कुलकर्णी, यांच्याप्रमाणेच कायदेशीर काब्जादाराचा दर्जा मिळाला. 'इनाम वर्ग ६-ब' मध्ये समाविष्ट या वतनदारांना पारंपारिक सेवा आणि प्रशासकीय जबाबदाऱ्यांशी निगडीत अधिकार होते. आजही अनेक गावामध्ये 'हाडकी', 'हाडोळी' 'महारपाळी' अशी नावे या ऐतिहासिक परंपरेचे पुरावे म्हणून उभी असल्याचे दिसून येते.[१]

महार वतन एका बाजुने महारांच्या उपजीविकेचा आधार होते आणि दुसऱ्या बाजूने अपमानकारक सामाजिक संरचनेचे ओझे होते. हीच अवस्था लक्षात ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार वतनदारांची ही सेवा व्यवस्था मोडून काढण्याची आणि श्रमाला योग्य मोबदला मिळावा यासाठी योग्य असा महार वतनाचा लढा हाती घेतला. १९२१ मध्ये महार वतनदारांनी छत्रपती शाहूमहाराजांकडे दिलेल्या अर्जानंतर शाहू महाराजांनी वतन रद्द करून जमिनी रयतवारीत समाविष्ट केल्या आणि कोणतीही किंमत न घेता कब्जा अधिकार दिला होता. हा महत्त्वाचा निर्णय महार वतनदारांच्या मुक्ती आणि स्वाभिमानाचा ऐतिहासिक टप्पा ठरला असे वाटते.

**वतनाचा अर्थ**

अ) 'गावासाठी, देशासाठी करत असलेल्या कर्तव्याबद्दल त्या व्यक्तीचा मानसन्मान राखण्यासाठी, उपजीविकेकरिता लोकांनी दिलेले व वंशपरंपरेने चालणारे उत्पन्न म्हणजे वतन होय.'

ब) 'कर्तव्ये उपभोगण्यासाठी लोकमान्य व राजमान्य पद्धत म्हणजे वतन होय'.

क) वंशपरंपरेने काम करण्याचा हक्क असणारा किंवा वतन धारण करणारा गावकरी त्याचा धंदा हा कोणत्याही प्रकारचा असो, त्यास वतन म्हणतात.

वतनामध्ये हक्क, अधिकार, नेमणूक व वृत्ती यांचा समावेश होतो. 'वतन' या संज्ञेच्या उत्पत्तीबाबत विविध प्रकारची मते विद्वानांनी मांडलेली आहेत. त्यांच्या मते, हा शब्द 'वतन' या संस्कृत शब्दापासून बनलेला आहे. त्याचा अर्थ उपजीविकेचे साधन, उदरनिर्वाह व वेतन असा आहे. काही विद्वानांच्या मते, 'वतन' हा अरबी शब्द असून 'वतन' म्हणजे जन्मभूमी व घर असा अर्थ आहे.[२]

**महार वतनातील गावकीची कामे व जबाबदाऱ्या**

गावकीमध्ये महार वतनदारांची कामे व जबाबदाऱ्या अनेक होत्या. त्या जबाबदारीने त्यांना पार पाडाव्या लागत होत्या.

गावाचा पहारा व सुरक्षा करणे. गावाच्या सीमा निश्चित करणे. सरकारी आदेश व संदेश पोहोचवणे. गुन्हेगारांवर नजर ठेवणे. युद्धकाळात लष्करास सहाय्य करणे. ही कामे पिढ्यानपिढ्या सक्तीने महार वतनदारांना करावी लागत होती. परंतु कामाच्या बदल्यात निश्चित असा चांगला मोबदला मिळत नव्हता. माणूस म्हणून मानसन्मान दिला जात नव्हता.

**महार वतनदारांची कामे व कामातील अनिश्चितता**

महार वतनातील पहिला दोष म्हणजे महार वतनदारांची कामे निश्चित नव्हती. ती मुद्दाम होऊन सरकारने अनिश्चित ठेवली होती. १८७४ चा वतन कायदा पास झाला. त्यावेळी १८, ६९ आणि ८३ या कलमांवर वादविवाद झाला. महारांना ठराविक कामे करता यावीत या हेतूने काही लोकांनी या कलमामध्ये फेरफार करण्याची सूचना कायदे कॉन्सिलमध्ये करून सुद्धा महारासारखे काही सांगकामे व हरकामे नोकर पाहिजेत असा आग्रह सरकारने धरल्यामुळे ती सूचना अमान्य होवून महार लोक हे सरकारी गाव नोकर आहेत. त्यामुळे त्यांनी कोणती कामे करायची हे ठरवण्याचा अधिकार जिल्हा कलेक्टरला दिला गेला. महार वतनदारांना कोणती सरकारी कामे करावी लागतात याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

१. महसूल गोळा करण्यासाठी सरकरी अधिकाऱ्यांना मदत करणे.
२. तालुका व इतर ठिकाणी सरकरी अधिकारी सांगतील त्या ठिकाणी टपालाची ने आण करणे.
३. तालुक्याच्या ठिकाणी कचेरीत महसूल पोहचविणे.
४. जन्म-मृत्यूची माहिती गोळा करणे.
५. सरकारी अंमलदार गावी येतील त्यावेळी त्यांचा बंदोबस्त ठेवणे. त्यांची सांगतील ती कामे करणे.
६. अन्य प्रकारची पडतील ती कामे करणे.

वरील कामाचे स्वरूप दिसायला अगदी थोडे वाटते. ती कामे किती संतापजनक होती. हे महार लोकांनाच माहित कारण जरी साधी टपालाची बाब विचारात घेतली तरी महारांना आठ ते दहा मैल जावे लागत होते. साधे २ पैशाने जाणाऱ्या पत्रासाठी भर उन्हामध्ये अन्न-पाण्यावाचून अनवाणी जावे लागत होते तेव्हा ते अन्यायकारक काम असल्याचे समजते.[३]

बिगार ही कायद्यामध्ये कोठेच सांगितलेली नव्हती. अंमलदार सांगतील ती कामे करणे व बंदोबस्त ठेवणे या त्यांच्या आज्ञेमध्ये वेठबिगारीचा समावेश झाला. ही बिगार म्हणजे त्या काळामधील गुलामगिरी, बेबंदशाही होती. नाशिक येथील देवळे येथे असणाऱ्या महार लोकांनी कलेक्टरकडे केलेल्या अर्जामध्ये ज्या प्रकारच्या बिगारीसाठी राबवले जाते याची तक्रार केली. त्या बिगारीचा तपशील खाली देण्यात आला आहे.

**बिगारीचा तपशील**

१.जोड्यांच्या बिगारी २. बुटांच्या बिगारी ३. म्हशीच्या बिगारी ४. गाईच्या बिगारी. बकऱ्यांच्या बिगारी ६. घोड्याच्या बिगारी ७. बैलांच्या बिगारी ८. राघू मैनांच्या पिंजऱ्यांच्या बिगारी ९. पाळीव हरणांच्या बिगारी १०. पेटयांच्या बिगारी ११. पलंगाच्या बिगारी १२. मुलींच्या बिगारी १३. भांड्यांच्या बिगारी १४. जात्यांच्या बिगारी १५. मैनाच्या पिंजऱ्याच्या बिगारी १६. तलवारीच्या बिगारी १७. मुलांच्या बिगारी १८. भाजीच्या बिगारी १९. बंदुकीच्या बिगारी २०. पोतड्याच्या बिगारी २१. कांद्याच्या बिगारी २२. आंब्याच्या बिगारी २३. शिपायांच्या गळ्यांतल्या पोतड्याच्या बिगारी २४. कंबरेच्या पट्ट्यांची बिगारी २५. चाकाच्या बिगारी २६. कपड्यांच्या बिगारी २७. लाकडाच्या बिगारी २८. उसांच्या बिगारी २९. जाजमांच्या बिगारी ३०. नांगराच्या बिगारी ३१. पार्सलाच्या बिगारी ३२. फळांच्या बिगारी ३३. चाबकाच्या बिगारी ३४. माचवेबाज यांच्या बिगारी ३५. खुर्च्यांच्या बिगारी ३६. बाजेच्या बिगारी ३७. खोगीरांच्या बिगारी ३८. पोत्यांच्या बिगारी ३९. सबळा जोते यांच्या बिगारी ४०. टिकावांच्या बिगारी ४१. कुत्र्यांचा बिगारी ४२. मडक्यांच्या बिगारी ४३. गाडीचे ज्युंचे बिगारी[४]

अशाप्रकारच्या एकूण ४३ बिगारींची कामे महार वतनदारांना करावी लागत होती.

**महार वतनाचे हक्क व लाभ**

महार वतनदारांना सेवांच्या बदल्यात पुढील हक्क व लाभ दिले जात होते. गावातील ठराविक जमीन वापरण्याचा हक्क. शेतकऱ्यांकडून धान्य किंवा अन्नाचा वाटा. काही सण-उत्सवांत तुटपुंजे मानधन. तथापि, हे हक्क मर्यादित व अनिश्चित स्वरूपाचे होते. कायम स्वरूपाचे नव्हते.

**महार वतनदारांना मिळणारा मोबदला**

महारकीच्या कामाचा विचार केला असता, महार वतनदारांना कामाचा किती मोबदला मिळतो. याचा ही विचार करणे गरजेचे आहे. महार वतनदारांना कामाच्या मोबदल्याच्या स्वरुपात जे काही अल्प व अनिश्चित स्वरूपाचे वेतन मिळत. ते दिवाण, सेनापती, फडणीस, मुजुमदार, चिटणीस, पाटील आणि कुलकर्णी यांना मिळणाऱ्या सनदी व इनामाच्या तुलनेत फार कमी मिळत असत. काम जास्त आणि मोबदला कमी अशी महार वतनदारांची अवस्था होती. वतनामुळे महार वतनदार हे लाचार बनले. त्यांचे आत्मतेज ही नष्ट झाले. त्यांच्या महत्वकांक्षा या महार वतनामुळे धुळीस मिळाल्या होत्या.

महार वतनदारांना कामाचा मोबदला म्हणजे मुशाहिरा महारकीच्या कामासाठी महार वतनदारांना साधारणपणे तीन प्रकारचा मोबदला मिळत असल्याचे दिसून येते. अ) इनाम जमीन ब) बलुते क) नक्त पगार मात्र हा मोबदला सर्वत्र सारखा असेलच असे नाही. काही ठिकाणी इनाम जमीन होती तर काही ठिकाणी नव्हती. तर काही ठिकाणी फक्त बलुते आणि पगार मिळत होता. काही ठिकाणी बलुते आणि जमीन या दोनच उत्पन्नाच्या बाबी होत्या[५]

मोबदल्याचे विविध प्रकार असण्याचे कारण म्हणजे त्याकाळी कोणाकडून तरी महार वतनदारांना दरमहा ५-६ रुपये इतका पगार मिळावा, ही अपेक्षा होती. एवढा पगार मिळावा या अशानेच जमीन, पगार, आणि बलुतं महार वतनदारांना दिल जात असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मोबदल्याचे प्रकार समजले त्यावेळी ते म्हणतात की, **'हा मोबदल्याचा काटा कमीच्या बाजूने झुकेल परंतु अधिकच्या बाजूने सहसा झुकणार ही नाही मात्र हल्ली असणाऱ्या महागाईच्या काळामध्ये तो पुरणार नाही'**. इतक्या कमी पगारावर महार वतनदारांना सरकार राबवते ही गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकराना न पटणारी होती, कारण हा अल्प असणारा मोबदला महार वतनदारांच्या पदरात पडेल याची खात्री नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, जमीन महार वतनदारांची असली तरी ती नेहमी त्यांच्या ताब्यामध्ये राहील असे नाही. महार वतनदारांना वतन जमीन भाऊबंदकीच्या बाहेर इतरांना कोणत्याही सबबीवर देता येत नव्हती. अशाप्रकारचे सरकारी निर्बंध असताना सुद्धा अनेक महार वतनदारांच्या वतनी जमिनी परक्यांच्या, धनदांडग्यांच्या ताब्यात गेल्या.[६]

**महार वतन व्यवस्थेचे सामाजिक परिणाम**

या व्यवस्थेमुळे महार समाजावर अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार व आर्थिक शोषण लादले गेले. महत्त्वाची कामे करूनही त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळाली नाही. त्यामुळे आत्मसन्मानाचा अभाव व मानसिक गुलामी निर्माण झाली. त्यांचे जीवन हालाकीचे झाले होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महार वतन व्यवस्थेला गुलामगिरीचे प्रतीक मानले. त्यांनी या व्यवस्थेविरुद्ध जनजागृती केली व वतनदारी नष्ट करण्यासाठी आंदोलन केले. त्यांच्या विचारांमुळे महार समाजात आत्मसन्मान व सामाजिक जागृती निर्माण झाली. सरकार महार वतनदारांचा योग्यविचार करत नव्हते त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी **"गुलामाला त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल"** अशा स्वरुपाची जाणीव भारतातील कोट्यावधी दलित, पीडित, शोषित, अस्पृश्य, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन व उपेक्षित यांना करून दिली. त्यांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकिय गुलामगिरीमधून मुक्त करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले होते. हातचे सोडून पळत्याच्या पाठीशी धावल्याशिवाय प्रगती होत नसते तेव्हा अशा समाजाला गुलामगिरीमधून मुक्त करण्यासाठी आपल्या 'बहिष्कृत भारत' या नियतकालिकामधून महार

वतनावरील पाच अग्रलेख प्रसिद्ध केले. २ सप्टेंबर १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' मधील पहिला अग्रलेख डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रकाशित करून महार वतनदारांना जागृत करण्याचा प्रयत्न केला. महार वतनदार व अस्पृश्य लोक हे वतन पद्धतीच्या पिंजऱ्यामध्ये पिढयान पिढ्या अडकले आहेत.[७] त्यामुळे त्यांची अवस्था हीन व लाचार झाली आहे. असे विदारक वर्णन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लेखनामधून केले होते.

महार वतन हे एकप्रकारची गुलामीच होती. ते गुलामीचे प्रतिक म्हणून ओळखले जात होते. या वतनामुळे महार लोक आपला स्वाभिमान गमावून बसले होते. वतनदारीमुळे महार समाजाला विशिष्ट वर्गामध्ये बंदिस्त करून ठेवले होते. या व्यवस्थेने समाजाची विषम विभागणी केली आहे. वतनदारी पद्धतीमुळे मानवी समाजातील खूप मोठा घटक गुलामीचे जीवन जगत होता. याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना झाली होती. समाजामध्ये अस्तित्वात असणारी ही पद्धत समाजाला अधोगतीकडे नेणारी होती. त्याचा शोध घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या महारवतन पध्दतीत फक्त सुधारणा केली नाही तर या महार वतन पद्धतीचा पूर्ण बिमोड करून समाजातील या उपेक्षित घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम घेतले.[८]

**महार वतन व्यवस्थेचा अंत**

ब्रिटिश काळात वतनदारी पद्धती कमकुवत झाली. स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेतील समतेच्या तत्त्वांमुळे व डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या प्रभावामुळे महार वतन व्यवस्था रद्द करण्यात आली. यामुळे महार समाज मुक्त झाला, मात्र सामाजिक व आर्थिक संघर्ष कायम राहिला. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ मुंबई गावची कनिष्ठ (महार) वतने नाहीशी करण्याबाबतचा अधिनियम १९५८ महाराष्ट्र शासन राजपत्रात ही २० जानेवारी १९५९ रोजी प्रथमतः इंग्रजीमध्ये प्रसिद्ध केला गेला. (परिशिष्ट-३) त्यानुसार महाराष्ट्रातील विधानसभेचे विरोधी पक्षनेते डॉ. आर. डी. भंडारे यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी पुणे, सातारा, औरंगाबाद आणि कुलाबा येथील १ ऑगस्ट १९५९ रोजी महार वतन खालसा केले. १९ मार्च १९२८ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे महार वतन बिल मुंबई कायदे मंडळामध्ये मांडले होते त्यास त्यांच्या अनुयायांमुळे १ ऑगस्ट १९५९ रोजी म्हणजेच ३३ वर्षे २ महिने २६ दिवसांनी यश आले. महार वतन नष्ट झाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार झाले.[९] त्यामुळे महार समाज आजमितीला गुलामीचे जीवन सोडून स्वाभिमानाने जगू लागला आहे. प्रमाणिक कष्ट करून उदरनिर्वाह करू लागला आहे.

वास्तविक पाहता वरील कायद्याचा महार वतनदारांना म्हणावा तेवढा फायदा झाला नाही. कारण अनेकांना हा कायदा त्या काळी समजलेला नव्हता. कारण अनेक महार लोक यांना लिहता वाचता येत नव्हते. उच्चवर्णीय आणि त्यांना मानणारे हे लोक शिकलेले होते. हेच लोक शासनदरबारी असल्यामुळे त्यांनी हा कायदा गोपनीय ठेवला. अनेक पळवाटा शोधल्या. कायदा होण्याअगोदर आणि कायदा झाल्यावर गावालगतच्या अनेक वतनी जमिनी धनदांडगे आणि त्यांच्या नातेवाईकांनी हडप केल्या. कागदोपत्री स्वत:च्या नवे करून घेतल्या. त्यामध्ये तीन वर्षाची मुदत ही योग्य वाटत नाही. कारण हजारो वर्ष केलेल्या सेवेचे इनाम हे हस्तांतरणीय नसतानाही हस्तांतरित झाले. याबातीत कोणीही अवाक्षर काढत नाहीत.[१०] हा खूप मोठा अन्याय महार वतनदारांवर झाल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष**

महार वतन व्यवस्था ही ग्रामीण प्रशासनासाठी उपयुक्त असली, तरी ती सामाजिक अन्याय आणि विषमतेची जनक ठरली. या व्यवस्थेचा अंत होणे हे सामाजिक न्याय व समतेसाठी अत्यावश्यक होते. आज या महार वतनाच्या इतिहासाचा अभ्यास करून समतावादी समाजनिर्मितीस चालना देणे आवश्यक आहे. महार वतन व्यवस्थेचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, सेवा व हक्क यामध्ये समतोल नव्हता. कामे सक्तीची होती, परंतु मोबदला अपुरा व अनिश्चित होता. त्यामुळे ही व्यवस्था शोषणात्मक ठरली. सामाजिक सुधारणांच्या अभावामुळे ही स्थिती दीर्घकाळ टिकून राहिली. महार वतन व जातिव्यवस्था महार वतन ही केवळ प्रशासकीय व्यवस्था नसून ती भारतीय जातिव्यवस्थेशी घट्ट जोडलेली होती. महार समाजाला खालचा दर्जा देऊन त्यांच्याकडून अत्यावश्यक कामे करून घेतली जात. यामुळे सामाजिक विषमता अधिक दृढ झाली. ब्रिटिश काळात वतनदारी पद्धतीत काही

प्रशासकीय बदल झाले. काही ठिकाणी वतन खरेदी-विक्रीस परवानगी देण्यात आली. तथापि, महार समाजाच्या सामाजिक स्थितीत फारसा बदल झाला नाही. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने समानता व स्वातंत्र्याची हमी दिली. वतनदारी व्यवस्था रद्द झाल्यामुळे महार समाजाला नव्या संधी उपलब्ध झाल्या. शिक्षण, नोकरी व राजकीय सहभाग वाढू लागला आहे. आज महार वतन व्यवस्था अस्तित्वात नसली, तरी तिचे सामाजिक आणि आर्थिक परिणाम अजूनही दिसून येतात. राज्यभर पसरलेल्या सुमारे पाच लाख एकर महार वतनी जमिनीवर राजकारणी, उद्योजक आदींचा वाढता डोळा आहे. तसेच अवैध्य हस्तातरांची मोठी संख्या असल्याचे दिसून येते. यामुळे अनेक नवीन प्रश्न निर्माण होत आहेत. या सर्वांच्या पाठीमागे महार वतन व्यवस्थेचा इतिहास, दीर्घकालीन शासनाचे व अधिकारी वर्गाचे दुर्लक्ष आणि जमीनीचे वाढलेले प्रचंड किंमती यामुळे नवीन आर्थिक स्वार्थाचे प्रश्न तयार होऊ लागले आहेत. सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या चळवळींसाठी महार वतनाचा अभ्यास मार्गदर्शक ठरत असल्यामुळे त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची**

१. मून वसंत व इतर (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९०, पृ. ९०.
२. अत्रे त्रिं. ना., गाव-गाडा, सरिता प्रकाशन, पाचवी आवृत्ती पुणे, २०१८, पृ. १६.
३. कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१३, पृ. ४२-४६.
४. वाघमारे केशव, 'महार वतन'च्या लुटीला अभय? दैनिक लोकसत्ता, २०२५ पृ. ७.
५. कांबळे बळीराम, महारवतनी इनामी जमिनीचा प्रश्न, सुगावा प्रकाशन, पुणे, २००५, पृ. १८.
६. खैरमोडे चां. भ., भीमराव रामजी आंबेडकर चरित्र-खंड २., समता शिक्षण संस्था, पुणे, २०२२, पृ. २४८-२४९.
७. आंबेडकर बी. आर., महार आणि त्यांचे वतन, नाग-नालंदा प्रकाशन, चौथी आवृत्ती सांगली, २०१३, पृ. ५३-५४.
८. सिंगारे अनिल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि ब्रिटिश संबंध, अरुण प्रकाशन, लातूर, २०१८, पृ. १३७.
९. भंडारे एस. आर., मानवतेचे नवनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विनिमय पब्लिकेशन, मुंबई, २०१४, पृ. ९२-९९.
१०. सिंह ब्रिजेश (संपा.) आपला आदर्श आपली प्रेरणा महामानव, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१७, पृ. ७२.